**CNR No :- MHSI100000482025**

**–: नियमित दिवाणी मुकदमा क्र. १४/२०२५ :–**

**–: निशाणी ४१ वरील आदेश :–**

प्रतिवादी क्र. २ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्याच्या विरुद्ध पारीत झालेला ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. २ चे म्हणणेनुसार, प्रस्तुत दावा वादीने सरसनिरस धडेवाटप होवून मिळण्यासाठी व हक्कप्रस्थापनेचा ठराव होवून मिळण्याकरीता प्रतिवादीविरुद्ध दाखल केला असून प्रतिवादी त्याची कैफियत वेळेत दाखल करु न शकल्याने प्रतिवादी विरुद्ध No W.S. चा हुकुम झालेला आहे. प्रतिवादी २ यांस वेळेवर माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांची कैफियत वेळेत दाखल करु शकला नाही. सदरची कैफियत वेळेत दाखल न करण्यामागे प्रतिवादीचा कोणताही गैर हेतू नव्हता. प्रतिवादीची बाजू कोर्टासमोर न आल्यास व प्रतिवादीची कैफियत स्विकारली न गेल्यास प्रतिवादीवर अन्याय होणारा आहे व प्रतिवादीचे नुकसान होणारे आहे. सबब, प्रतिवादी विरुद्ध झालेला No W.S. चा आदेश रद्द होऊन त्याची कैफियत अभिलेखी घेण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीस म्हणणे दाखल करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही वादींनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत दाखल न केल्याने दि.०३.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुतचा अर्ज वादीं विरुद्ध विना म्हणणे चालविणेत आला.

०४. अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.०२ यांनी त्यांची कैफियत सादर न केल्यामुळे त्यांच्या विरुद्ध कैफियत नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र. २ यांनी सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला आहे. अर्जातील नमुद कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. न्यायालयाचा अमुल्य वेळ प्रतिवादीच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र. २ यास त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. प्रतिवादीस कैफियत सादर करण्याची उचित संधी नाकारल्यास त्यांच्या न्यायहक्कांवर गदा येणारी आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादीने सादर केलेल्या कैफियतीद्वारे दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. प्रतिवादीने केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परीमार्जन होणारे आहे. या सर्व कारणांचा साकल्याने विचार करता, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :–

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.४१ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे मात्र) भरल्या नंतर प्रतिवादी क्र. ०२ विरुद्ध पारीत झालेला ''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. सदर खर्चाची रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधीकरण (Free Legal Aid) यांच्या कार्यालयात

जमा करण्यात यावी.

४. प्रतिवादी क्र.२ यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.01.20 16:12:32 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – २०.०१.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.